राष्ट्रीय सेवा योजना
सन २०१९-२० या वर्षासाठी शासन अनुदानीत रासेयो विद्यापीठनिहाय विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासेयो-२०१९/प्र.क्र.६४ /१९/साशि-७
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २८ मे, २०१९.

वाचा :
भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालय, युवा कार्यक्रम विभाग, शास्त्री भवन, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र.G-२००११/१/२०१९-NSS, दिनांक २२ एप्रिल, २०१९

प्रस्तावना :
राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र शासीत योजना असून, या योजनेंतर्गत नियमित कार्यक्रम आणि विशेष शिबीर या दोन उपक्रमांसाठी विद्यापीठ/संस्थांना दरवर्षी केंद्र शासनातर्फे विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात येते. सन २०१९-२० या वर्षाकरिता संदर्भाधिन पत्रान्वये केंद्र शासनाने रा.से.यो. विद्यापीठनिहाय प्रवर्गनिहाय म्हणजेच अनुसूचित जातीसाठी ११.८ टक्के, अनुसूचित जमातीसाठी ९.४ टक्के व इतरांसाठी ७८.८ टक्के अशाप्रमाणे विभागणी करुन, अनुसूचित जातीसाठी ३८,६७०, अनुसुचित जमातीसाठी ३०,८०० व इतरांसाठी २,५८,२३० याप्रमाणे प्रवर्ग विभागणी करुन, एकूण नियमित कार्यक्रमासाठी ३,२७,७०० आणि विशेष शिबिर कार्यक्रमासाठी १,६३,८५० इतकी विद्यार्थी संख्या महाराष्ट्र राज्याकरिता मंजूर केली असून, त्याचे विद्यापीठ/संस्थानिहाय वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे, राष्ट्रीय सेवा योजनेसाठी सन २०१९-२० च्या मंजूर तरतूदीनुसार नियमित कार्यक्रमासाठी ३,२७,७०० आणि विशेष शिबीर कार्यक्रमासाठी १,६३,८५० अशी विद्यार्थी संख्या मान्य करण्यात आली असून, ती विद्यापीठ/संस्थानिहाय पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वाटप करण्यात येत आहे.

अ.क्र	विद्यापीठाचे नाव	नियमित कार्यक्रम स्वयंसेवक संख्या प्रवर्गनिहाय				विशेष शिबिर स्वयंसेवक संख्या
		एकूण	अनु.जाती	अनु.जमाती	इतर	
१	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	४७,७५०	५,३०८	३,९६२	३८,४८०	२३,८७५
२	मुंबई विद्यापीठ, मुंबई	४२,१००	४,२२८	३,१०६	३४,७६६	२१,०५०
३	डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	३४,४००	४,१६०	२,२३४	२८,००६	१७,२००
४	संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे (+ २ स्तर)	३३,८००	३,९८८	३,१८२	२६,६३०	१६,९००
५	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	२६,८००	४,५३०	२,८७४	१९,३९६	१३,४००
६	संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती	२५,४००	३,०९६	२,३७८	१९,९२६	१२,७००
७	शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२४,६००	२,९०४	१,२५४	२०,४४२	१२,३००
८	कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव	१५,०००	१,८६८	३,४१४	९,७१८	७,५००
९	स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	१५,०००	१,७७०	१,५७०	११,६६०	७,५००
१०	S.N.D.T. महिला विद्यापीठ, मुंबई	१०,०००	१,१८०	९४०	७,८८०	५,०००
११	संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई	९,०००	१,०६२	१,००६	६,९३२	४,५००
१२	पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर	९,२००	१,०८६	३८६	७,७२८	४,६००
१३	गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली	९,०००	१,०६०	२,०२०	५,९२०	४,५००

अ.क्र	विद्यापीठाचे नाव	नियमित कार्यक्रम स्वयंसेवक संख्या प्रवर्गनिहाय				विशेष शिबिर स्वयंसेवक संख्या
		एकूण	अनु.जाती	अनु.जमाती	इतर	
१४	महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक	९,०००	४६४	८४४	७,६९२	४,५००
१५	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी	३,८००	४४८	३५८	२,९९४	१,९००
१६	वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी	२,८००	३३२	२००	२,२६८	१,४००
१७	डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला	२,६००	२९४	२४२	२,०६४	१,३००
१८	भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे	१,७००	१९०	१५०	१,३६०	८५०
१९	यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक	१,५००	१९०	२५८	१,०५२	७५०
२०	डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली	१,२००	१४२	१३२	९२६	६००
२१	महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर	१,०००	१४२	११६	७४२	५००
२२	डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे	७००	८४	६४	५५२	३५०
२३	संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई	४००	४६	३८	३१६	२००
२४	कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक	५००	४६	३२	४२२	२५०
२५	महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा	२५०	२८	२२	२००	१२५
२६	उन्नत प्रौद्योगिकी रक्षा संस्थान (अभिमत विद्यापीठ), पुणे	२००	२४	१८	१५८	१००
	एकूण	३,२७,७००	३८,६७०	३०,८००	२,५८,२३०	१,६३,८५०

विद्यापीठ/संस्थांनी शासनाने त्यांना वरीलप्रमाणे रा.से.यो. विद्यापीठनिहाय, प्रवर्गनिहाय मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी संख्या, या योजनेखाली नोंदवून घेवू नये. तसेच सन २०१९-२० या वर्षासाठी प्रवर्गनिहाय विद्यार्थी संख्येनुसार विद्यापीठे/संस्थांनी संबंधितांना वाटप करण्यात यावेत.

विद्यापीठ/संस्थानी त्यांना वाटप केलेल्या विद्यार्थी संख्येचे, त्यांना संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना प्रवर्गनिहाय वाटप करावे व त्याची प्रत शासनास पाठवावी. विद्यापीठांनी प्रत्यक्षात नोंदविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या शासनाला दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत कळवावी.

या आदेशानुसार मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येकरिता सन २०१९-२० चा अनुदानाचा प्रथम हप्ता लवकरच मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१५०१५७३५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Hansraj Salunke

Digitally signed by Atul Hansraj Salunke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=b264114e5f2ab2d209a59196e3eb37b12d34901b451d626c61cd53a462c38f25, serialNumber=6d891625fcc94630c100902f1322ae39cead880799263a1a29663e9104afe30b, cn=Atul Hansraj Salunke
Date: 2019.05.28 15:09:44 +05'30'

(डॉ. अतुल साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी.

प्रत,

१. उप सचिव, भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालय, युवा कार्यक्रम विभाग, शास्त्री भवन, नवी दिल्ली,
२. क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, विभागीय केंद्र, पुणे,
३. कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
४. संचालक, उच्च शिक्षण, पुणे,
५. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे (+२ स्तर),
६. संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई,
७. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई,
८. कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, सर्व विद्यापीठे,
९. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१०.वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई,
१२.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.निवडनस्ती, साशि-७.